# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,परभणी

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdcparbhani@gmail.com फॅक्स - (02452) 223774 दुरध्वनी - 223702

वाचाः- 1. शासन निर्णय पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक 07 एप्रिल 2003

2. शासन निर्णय पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक दिनांक 31 जुलै 2013

3. शासन निर्णय पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक दिनांक 22 ऑगस्ट 2017

जा.क्र.2021/अे-1/गृह/पोल/ /सिआर-6 दिनांक : 20.12.2021

## :: **आ दे श** ::

ज्याअर्थी संदर्भ क्र. 3 वरील शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या दि. 22.08.2017 रोजीच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम 10.08.2017 च्या नियम 5 (3) व त्यासोबत दिलेल्या स्पष्टीकरणात्मक टिपणीनुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादींच्या वापराबाबत श्रोतेगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्हयाच्या निकडीनुसार वर्षामध्ये 15 दिवस निश्चित करुन सकाळी 6 वाजल्यापासून ते रात्री 12 वाजेपर्यंत सूट जाहिर करण्याकरिता संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना राज्य शासनाद्वारे प्राधिकृत करण्यात आले आहे.

तसेच सन 2022 या वर्षासाठी राज्य शासनाने दि. 05/09/2016 रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या 15 दिवसांकरिता आगामी उत्सव कालावधी लक्षात घेता सन 2022 साठी 15 दिवस घोषीत करणे उचित आहे.

त्याअर्थी मी **आंचल गोयल, जिल्हादंडाधिकारी परभणी** या आदेशाद्वारे संदर्भ क्र. 3 वरील शासन निर्णयानुसार परभणी जिल्हयातील आगामी उत्सव कालावधी लक्षात घेता सन 2022 मध्ये 2 दिवस राखीव ठेवुन खालील प्रमाणे उर्वरित 13 दिवसांसाठी फक्त ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी 6 वाजल्यापासून रात्री 12 वाजेपर्यंत ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्यास सुट जाहिर करण्यात येत आहे.

1. शिवजयंती : 1 दिवस
2. ईद-ए-मिलाद : 1 दिवस
3. डॉ.आंबेडकर जयंती : 1 दिवस
4. 1मे, महाराष्ट्र दिन : 1 दिवस
5. गणपती उत्सव : 4 दिवस (दुसरा दिवस, पाचवा दिवस, गौरीविसर्जन व अनंत चर्तुदशी)
6. नवरात्री उत्सव : 2 दिवस (अष्टमी व नवमी)
7. दिवाळी : 1 दिवस (लक्ष्मीपूजन)
8. 31डिसेंबर : 1 दिवस
9. ख्रिसमस : 1 दिवस
10. उर्वरित 2दिवस : 2 दिवस ( परवानगी राज्य शासनाच्या मान्यतेने महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार दिली जाईल)

या आदेशाची अंमलबजावणी या जिल्हयाचे हद्दीपुरती मर्यादित राहील.

स्वा/-

**(आंचल गोयल,भाप्रसे)**

**जिल्हादंडाधिकारी परभणी**

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,परभणी

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdcparbhani@gmail.com फॅक्स - (02452) 223774 दुरध्वनी - 223702

**प्रतिलिपी माहितीस्तव :**

1. मा.प्रधान सचिव, गृह विभाग (विशेष), मंत्रालय, मुंबई-32.
2. मा.संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय नविन प्रशासन भवन, 15 वा मजला, मुंबई.
3. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद.

**प्रतिलिपी आवश्यक त्या कार्यवाहीस्तव:-**

4. मुख्यकार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद परभणी.
5. जिल्हा पोलीस अधिक्षक, परभणी.
6. आयुक्त परभणी शहर महानगरपालिका परभणी.
7. जिल्हा प्रशासन अधिकारी,न.पा.प्र.जि.अ.का.परभणी.
8. उपप्रादेषिक अधिकारी,म.प्रदुषण नियत्रंण मंडळ,परभणी.
9. उपविभागीय दंडाधिकारी,परभणी/पाथरी/सेलु/गंगाखेड.
10. तालुका दंडाधिकारी, परभणी/पुर्णा/पालम/गंगाखेड/सोनपेठ/मानवत/पाथरी/सेलू/जिंतुर.
11. जिल्हा माहिती अधिकारी, परभणी यांना स्थानिक वृत्तपत्रातून व्यापक प्रसिद्धी करण्यास्तव.
12. या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिद्धीसाठी.

जिल्हा दंडाधिकारी कार्यालय परभणी

(आंचल **गोयल**,भाप्रसे)

जिल्हादंडाधिकारी **परभणी**